# घोषणा

## सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक संयुक्त पूर्व परीक्षा - २०१७ या पदाच्या स्पर्धा परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ

**जाहिरात क्रमांक २३/२०१७ - सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उप निरीक्षक संयुक्त पूर्व परीक्षा - २०१७** या पदांकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख १६/०५/२०१७ अशी आहे. सदरची पूर्व परीक्षा उपरोक्त नमूद तिन्ही पदांकरीता प्रथमच एकत्रित घेण्यात येत असल्याने व यानुषंगाने ऑनलाईन अर्ज करण्यास उमेदवारांना शेवटच्या दिवशी सर्व्हरवरील अतीताणामुळे आलेल्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन **फक्त** प्रस्तुत जाहिरातीकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेत दोन दिवसांची म्हणजेच **दि. १६ मे, २०१७ ऐवजी दि. १८ मे, २०१७ पर्यन्त** मुदतवाढ देण्यात येत आहे -

१. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १८ मे, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

२. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १९ मे, २०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६/०५/२०१७**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**